॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 10 --- DASHAMADHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Following the restoration of Goraksha’s sight, Machchindranath systematically transmits the full treasury of his divine knowledge to his disciple, instilling within him the fourteen distinct arts and a formidable array of celestial weapons. Attracted by the boy's unmatched dedication, a glorious assembly of deities—including Shri Rama, Ganesha, and the fierce Bhairavas—manifest in person to bestow their supreme blessings. Before departing, the gods declare that Goraksha must anchor this newfound knowledge through intense penance to unlock its true brilliance. One day, while left alone, the young disciple accidentally infuses life into a clay figure he was crafting for the village boys by chanting the sacred Sanjivani mantra. The divine energy instantly draws the celestial soul of Karabhanjan Narayan into the clay, transforming it into a crying, living infant. Terrified by this sudden magic, Goraksha and the fleeing children mistake the newborn for a malevolent spirit until Machchindranath intervenes to explain the miracle. To ensure the divine infant's well-being, the master places him in the care of a devoted, childless Brahmin couple, Ganga and Madhu, miraculously inducing milk in the mother's breast and naming the child Gahini. Recognizing that Goraksha’s immense powers remain uneven without spiritual discipline, Machchindranath leads his disciple away from the village, guiding him north toward the sacred heights of Badrikashrama to begin his essential austerities.

Ovee 1

वक्रतुंड गणाधिपती । विद्यार्णवा कळासंपत्ती । भक्तवरदा हरिसी आर्ती । मंगळमूर्ती गजानना ॥ १ ॥

Transliteration

Vakratunda Ganaadhipatee | Vidyaa-arnavaa kalaa-sampattee | Bhakta-varadaa harisee aartee | Mangala-moortee Gajaananaa ||

Ovee 2

जयजयाजी आदिनाथा । मायाचक्रचालका अनंता । सर्वाधीशा भगवंता । साक्षात् अक्षय मोक्ष तूं ॥ २ ॥

Transliteration

Jayajayaajee Aadi-Naathaa | Maaya-chakra-chaalakaa anantaa | Sarva-adheeshaa bhagavantaa | Saakshaat akshaya moksha too ||

Ovee 3

तरी मागिले अध्यायीं निरुपण । श्रीगोरक्षाचा पावोनि जन्म । उपरी सेवूनि कनकगिरी ग्राम । विद्यार्णवी तो केला ॥ ३ ॥

Transliteration

Taree maagile adhyaayee nirupanu | Shree-Gorakshaachaa paavoni janmu | Uparee sevuuni kanaka-giree graamu | Vidyaa-arnavee toh kelaa ||

Ovee 4

तरी ती विद्या कोण कैसी । सकळ कळा श्लोकराशी । भविष्योत्तरपुराणासी । निरोपितों श्रीश्रोतियां ॥ ४ ॥

Transliteration

Taree tee vidyaa kona kaisee | Sakala kalaa shloka-raashee | Bhavishyo-uttara-Puraanaasee | Niropito Shree-shrotiyaa ||

Ovee 5

ब्रह्मज्ञान रसायन कविता । वेद शास्त्र ज्योतिष तथा । व्याकरण धनुर्धर जलतरंगता । संगीत काव्य अकरावें ॥ ५ ॥

Transliteration

Brahma-jnyaana rasaayana kavitaa | Veda shaastra jyotisha tathaa | Vyaakarana dhanurdhara jala-tarangataa | Sangeeta kaavya akaraave ||

Ovee 6

अश्वारोहण कोकशास्त्र । निपुण नाटच तथा चार । चतुर्दश विद्यांचा सागर । पूर्णपणें भरलासे ॥ ६ ॥

Transliteration

Ashva-aarohana koka-shaastru | Nipuna naatya tathaa chaaru | Chatur-dasha vidyaanchaa saagaru | Poorna-pane bharalaase ||

Ovee 7

प्रथम सांगून ब्रह्मज्ञान । स्वमुखीं केल्या परायण । विश्व आणि विश्वंभर दोन भावचि । ऐसा नुरविला ॥ ७ ॥

Transliteration

Prathama saanguuna Brahma-jnyaanu | Svamukhee kelyaa paraayanu | Vishva aani Vishvambhara donu |Bhaavachi Aisaa nuravilaa ||

Ovee 8

कीं बहुत जे अर्थप्रकार । जीवजंतु चराचर । तो ऐक्यमेळीं सकळ विस्तार । मीच ऐसें भाविलें ॥ ८ ॥

Transliteration

Kee bahuta je artha-prakaaru | Jeevajantu charaacharu | Toh aikyamelee sakala vistaaru | Meecha aise bhaavile ||

Ovee 9

कर्माकर्म सत्कर्मराशी । त्या नुरल्याचि कोणीही बीजांकुराशीं । वासना देऊनि योगफांसीं । कामनेतें नुरविती ॥ ९ ॥

Transliteration

Karma-akarma sat-karma-raashee | Tyaa nuralyaachi koneehee beeja-ankuraashee | Vaasanaa deuuni yoga-phaansee | Kaamanete nuravitoh ||

Ovee 10

ऐशा एकमेळें करुन । गोरक्ष झाला सनातान । एवंच सकळ ब्रह्मज्ञान । उपदेशिलें गुरुनाथें ॥ १० ॥

Transliteration

Aishaa ekamele karunu | Goraksha jhaalaa sanaataanu | Evamcha sakala Brahma-jnyaanu | Upadeshile guru-Naathe ||

Ovee 11

मग पूर्णपणाचें पात्र होऊनी । वसुधेकल्प अव्यक्त भुवनीं । सर्व आत्मरुप माननी । तत्स्वरुपीं प्रगटेल ॥ ११ ॥

Transliteration

Maga poorna-panaache paatra houunee | Vasudhe-kalpa avyakta bhuvanee | Sarva aatmarupa maananee | Tat-sva-rupee pragatela ||

Ovee 12

याउपरी वातपित्तकफहारक । रसायनविद्या सकळिक । किमया करणें धातु अनेक । हातवटी सांगितली ॥ १२ ॥

Transliteration

Yaauparee vaata-pitta-kapha-haaraku | Rasaayana-vidyaa sakaliku | Kimayaa karane dhaatu aneku | Haatavatee saangitalee ||

Ovee 13

कवित्व रसाळ नवरस । गणादि निरोपी दीर्घ ऱ्हस्व । व्यक्त अर्थलिंगप्रकरणास । व्यक्ताव्यक्त सांगितलें ॥ १३ ॥

Transliteration

Kavitva rasaala navarasu | Ganaadi niropee deergha rhasvu | Vyakta artha-linga-prakaranaasu | Vyakta-avyakta saangitale ||

Ovee 14

याउपरी वेदाध्ययन । सूक्तऋचेंत केला प्रवीण । दीर्घऱ्हस्वें छंदे निपुण । स्वरित छंदी अवघे गुण पैं केला ॥ १४ ॥

Transliteration

Yaauparee veda-adhyayanu | Sookta-richeta kelaa praveenu | Deerghar hasve chande nipunu | Svarita chandee avaghe guna pai kelaa ||

Ovee 15

ऋक् अथर्वण यजुर्वेद । सामवेदादि सांगूनिप्रसिद्ध । उपरि विद्या ज्योतिषसिद्ध । परिपूर्ण सांगितली ॥ १५ ॥

Transliteration

Riku atharvana yajurvedu | Saama-Vedaadi saanguuni-prasiddhu | Upari vidyaa jyotisha-siddhu | Paripoorna saangitalee ||

Ovee 16

सारस्वत किरात कोश । कोमुदी रघु हरिवंश । पंच काव्यें मीमांसा । साही शास्त्रें निवेदिलीं ॥ १६ ॥

Transliteration

Saarasvata kiraata koshu | Komudee Raghu Hari-vamshu | Pancha kaavye meemaansaa | Saahee shaastre nivedilee ||

Ovee 17

यावरी धनुर्धरविद्यानिपुण । सकळ शस्त्रीं केला प्रवीण । तीं सकळ अस्त्रें कोण कोण । नामें तयांचीं ऐकिजे ॥ १७ ॥

Transliteration

Yaavaree dhanurdhara-vidyaa-nipunu | Sakala shastree kelaa praveenu | Tee sakala astre kona konu | Naame tayaanchee aikije ||

Ovee 18

वातास्त्र आणि जलदास्त्र । उर्मी उभी कामास्त्र । वाताकर्षण बळ स्वतंत्र । पर्वतास्त्र सांगितलें ॥ १८ ॥

Transliteration

Vaataastra aani jalada-astru | Urmee ubhee kaamaastru | Vaataa-karshana bala svatantru | Parvata-astra saangitale ||

Ovee 19

वज्रास्त्र वासवशक्ति । नागास्त्र खगेंद्र संजीवनी ती । ब्रह्मास्त्रादि निवारणशक्ती । रुद्रास्त्र सांगितलें ॥ १९ ॥

Transliteration

Vajra-astra Vaasava-Shakti | Naagaastra khagendra sanjeevanee tee | Brahma-astraadi nivaarana-shaktee | Rudraastra saangitale ||

Ovee 20

विरक्तास्त्र दानवास्त्र । पवनास्त्र आणि कालास्त्र । स्तवन महाकार्तिकास्त्र । स्पर्शविभक्तास्त्र निवेदिलें ॥ २० ॥

Transliteration

Virakta-astra daanava-astru | Pavana-astra aani kaalaastru | Stavana mahaa-kaartika-astru | Sparsha-vibhakta-astra nivedile ||

Ovee 21

यावरी साबरीविद्या कवित्व । प्रत्यक्ष करुनि सकळ दैवत । तयांचा वरद पाणी निश्चित । गोरक्षमौळीं मिरवला ॥ २१ ॥

Transliteration

Yaavaree saabaree-vidyaa kavitvu | Pratyaksha karuni sakala daivatu | Tayaanchaa varada paanee nishchitu | Goraksha-maulee miravalaa ||

Ovee 22

तीं दैवतें कोण कोण । बावन्न वीर असती जाण । नरक कालिका म्हमंदा उत्तम । महिषासुर आराधिला ॥ २२ ॥

Transliteration

Tee daivate kona konu | Baavanna veera asatee jaanu | Naraka Kaalikaa Mhamandaa uttamu | Mahishaasura aaraadhilaa ||

Ovee 23

झोटिंग वेताळ मारुती । अस्त्रवीर भद्रपती । मूर्तिमंत सीतापती । वरदमौळीं स्पर्शीतसे ॥ २३ ॥

Transliteration

Jhotinga Vetaala Maarutee | Astra-veera Bhadra-patee | Moortimanta Seetaa-patee | Varada-maulee sparsheetase ||

Ovee 24

परम जादरीं आलिंगून । श्रीराम घेत चुंबन । म्हणे होई सनातन । कीर्तिध्वज मिरविजे ॥ २४ ॥

Transliteration

Parama jaadareen aalinguunu | Shree-Raama gheta chumbanu | Mhane hoee sanaatanu | Keerti-dhvaja miravije ||

Ovee 25

यावरी प्रत्यक्ष गजवदन । तोहि उतरला सहस्त्रकिरण । गोरक्षाते अंकीं घेऊन । वरदमौळी स्पर्शीतसे ॥ २५ ॥

Transliteration

Yaavaree pratyaksha gaja-vadanu | Tohi utaralaa sahastra-kiranu | Gorakshaate ankee gheuunu | Varada-maulee sparsheetase ||

Ovee 26

यावरी अष्टभैरव उग्र । तेही पातले तेथें समग्र । सिद्धभैरवादि काळभैरव सांग । बाळभैरवादि पातले ॥ २६ ॥

Transliteration

Yaavaree ashta-Bhairava ugru | Tehee paatale tethe samagru | Siddha-Bhairavaadi Kaala-Bhairava saangu | Baala-Bhairavaadi paatale ||

Ovee 27

वीरभैरवादि गणभैरव । ईश्वरभैरव रुद्रभैरव । भस्मभैरवादि महादेव । अपर्णापति पातला ॥ २७ ॥

Transliteration

Veera-Bhairavaadi Gana-Bhairavu | Eeshvara-Bhairava Rudra-Bhairavu | Bhasma-Bhairavaadi Mahaadevu | Aparnaa-pati paatalaa ||

Ovee 28

तेणें घेऊनि अंकावरतें । मुख कुरवाळिलें वरदहस्तें । खेळता बाबर धांवोनि येती । तेही देती आशीर्ववन ॥ २८ ॥

Transliteration

Tene gheuuni ankaa-varate | Mukha kuravaalile varada-haste | Khelataa Baabara dhaavoni yetee | Tehee detee aasheer-vachanu ||

Ovee 29

मुंडा चामुंडा शंखिनी डंखिनी । कुंड रंडा भालंडा यक्षिणी । चंडा वंडिका प्रत्यक्ष येऊनी । वर गोरक्षा देती त्या ॥ २९ ॥

Transliteration

Mundaa Chaamundaa Shankhinee Dankhinee | Kunda Randaa Bhaalandaa Yakshinee | Chandaa Vandikaa pratyaksha yeuunee | Vara Gorakshaa detee tyaa ||

Ovee 30

यावरी प्रगटूनि जलदैवत । तेव्हा त्यातें वर ओपीत । कुमारी धनदा नंदा विख्यात । देखता त्या गोमटया ॥ ३० ॥

Transliteration

Yaavaree pragatuuni jala-daivatu | Tevhaa tyaate vara opeetu | Kumaaree Dhanadaa Nandaa vikhyaatu | Dekhataa tyaa gomatyaa ||

Ovee 31

लक्ष्मी प्राज्ञा बाला बगला । नववी दैवत प्रत्यक्ष विमला । ऐशाजलदेवता येऊनि तत्काला । वर ओपिती बाळातें ॥ ३१ ॥

Transliteration

Lakshmee Praajnyaa Baalaa Bagalaa | Navavee daivata pratyaksha Vimalaa | Aishaa-jala-devataa yeuuni tatkaalaa | Vara opitee baalaate ||

Ovee 32

यावरी प्रत्यक्ष अष्टसिद्धी । होऊनि वर ओपिती वरमादी । आणिमा गरिमा विशाळबुद्धी । महिमा प्रकामें पातली ॥ ३२ ॥

Transliteration

Yaavaree pratyaksha ashta-siddhee | Houuni vara opitee varamaadee | Aanimaa Garimaa vishaala-buddhee | Mahimaa prakaame paatalee ||

Ovee 33

प्रथिमा प्राची वशित्वा सातवी । तेवीं ती सिद्धी महादेवी । सज्ज करुनि अस्त्रकार उभवी । अष्टसिद्धी तत्काळ त्या ॥ ३३ ॥

Transliteration

Prathimaa Praachee Vashitvaa saatavee | Tevee tee siddhee mahaa-Devee | Sajja karuni astrakaara ubhavee | Ashta-siddhee tatkaala tyaa ||

Ovee 34

असो बावन्न वीरांसहित । श्रीराम सूर्य जाहला प्राप्त । सर्वत्र ओपूनि मौळी हस्त । विद्या करी ओपिती ॥ ३४ ॥

Transliteration

Aso baavanna veeraan-sahitu | Shree-Raama soorya jaahalaa praaptu | Sarvatra opuuni maulee hastu | Vidyaa karee opitee ||

Ovee 35

असो वर देऊनि सद्विद्येसी । सर्वत्र वंदिती मच्छिंद्रासी । म्हणती महाराजा गोरक्षासी । तपालागीं बैसवीं ॥ ३५ ॥

Transliteration

Aso vara deuuni sad-vidyesee | Sarvatra vanditee Machchindraasee | Mhanatee Mahaaraajaa Gorakshaasee | Tapaa-laagee baisavee ||

Ovee 36

तपीं होतां अनुष्ठान । तेणें बळ चढे पूर्ण । मग ही विद्या तपोधन । लखलखीत मिरवेल ॥ ३६ ॥

Transliteration

Tapee hotaa anushthaanu | Tene bala chadhe poornu | Maga hee vidyaa tapodhanu | Lakhalakheeta miravelu ||

Ovee 37

जैसें खड्ग शिकले होतां । मग भय काय तें शत्रु जिंकितां । तेवीं तपोबळ आराधितां । सामर्थ्य सत्ता वाढेल ॥ ३७ ॥

Transliteration

Jaise khadga shikale hotaa | Maga bhaya kaaya tey shatru jinkitaa | Tevee tapobala aaraadhitaa | Saamarthya sattaa vaadhelu ||

Ovee 38

ऐसें वदोनि सकळ देव । पाहते झाले आपुलाले गांव । रामसूर्यादि महादेव । बावन्न वीरादि पैं गेले ॥ ३८ ॥

Transliteration

Aise vadoni sakala devu | Paahate jhaale aapulaale gaavu | Raama-Sooryaadi Mahaadevu | Baavanna veeraadi pai gele ||

Ovee 39

यावरी इंद्र वरुण अश्विनी । गणगंधर्वादि पातले भुवनीं । वर देती तयालागुनी । सकळ गेले स्वस्थाना ॥ ३९ ॥

Transliteration

Yaavaree Indra Varuna ashvinee | Gana-gandharvaadi paatale bhuvanee | Vara detee tayaa-laagunee | Sakala gele sva-sthaanaa ||

Ovee 40

याउपरी कोणे एके दिवशीं । गोरक्ष घोकितां सद्विद्येसी । मंत्रसंजीवनी पाठ मुखासी । करीत बैसला होता तो ॥ ४० ॥

Transliteration

Yaauparee kone eke divashee | Goraksha ghokitaa sad-vidyesee | Mantra-sanjeevanee paatha mukhaasee | Kareeta baisalaa hotaa toh ||

Ovee 41

जवळी नसतां मच्छिंद्रनाथ । बैसला होता एकांतांत । तो गांवचीं मुलें खेळत खेळत । तया ठायीं पातलीं ॥ ४१ ॥

Transliteration

Javalee nasataa Machchindra-Naathu | Baisalaa hotaa eka-antaantu | Toh gaavachee mule khelata khelatu | Tayaa thaayee paatalee ||

Ovee 42

हातीं कवळूनि कर्दमगोळा । मुलें खेळती आपुलें मेळां । तों गोरक्षापासीं येऊनि आगळा । बोल बोलती सकळीक ॥ ४२ ॥

Transliteration

Haatee kavaluuni kardama-golaa | Mule khelatee aapule melaa | Toh Gorakshaapaasee yeuuni aagalaa | Bola bolatee sakaleeku ||

Ovee 43

म्हणती गोरक्षा ऐक वचन । आम्हीं आणिला बहुत कर्दम । तरी शकट करुनि दे उत्तम । आम्हालागी खेळावया ॥ ४३ ॥

Transliteration

Mhanatee Gorakshaa aika vachanu | Aamhee aanilaa bahuta kardamu | Taree shakata karuni de uttamu | Aamhaa-laagee khelaavayaa ||

Ovee 44

येरु म्हणे शकट मजसी । करुं येत नाहीं निश्चयेंसी । येत असेल तुम्हां कोणासी । तरी करुनि कां घ्या ना ॥ ४४ ॥

Transliteration

Yeru mhane shakata majasee | Karu yeta naahee nishchayensee | Yeta asela tumhaa konaasee | Taree karuni kaa ghyaa naa ||

Ovee 45

ऐसें ऐकतां मुलांनी वचन । करीं कर्दम कवळून । आपुलाले करे करुन । शकट रचिती चिखलाचा ॥ ४५ ॥

Transliteration

Aise aikataa mulaannee vachanu | Karee kardama kavaluunu | Aapulaale kare karunu | Shakata rachitee chikhalaachaa ||

Ovee 46

कर्दमचक्र काष्ठ व्यक्त । शकट केला यथास्थित । वरीं उदेलें कल्पनेंत । शकटा सारथी असावा ॥ ४६ ॥

Transliteration

Kardama-chakra kaashtha vyaktu | Shakata kelaa yathaa-sthitu | Varee udele kalpanetu | Shakataa saarathee asaavaa ||

Ovee 47

म्हणूनि कर्दम घेऊनि गोळा । मुलें रचिती कर्दमपुतळा । परी तो साधेना मुलां सकळां । मग गोरक्षातें विनवीती ॥ ४७ ॥

Transliteration

Mhanuuni kardama gheuuni golaa | Mule rachitee kardama-putalaa | Paree toh saadhenaa mulaa sakalaa | Maga Gorakshaate vinaveetee ||

Ovee 48

म्हणती गोरक्षा आम्हांप्रती । साह्य देई शकटसारथी । आम्हां साधेना कर्दमनीती । तरी तूं करुनि देईं कां ॥ ४८ ॥

Transliteration

Mhanatee Gorakshaa aamhaam-pratee | Saahya deee shakata-saarathee | Aamhaa saadhenaa kardama-neetee | Taree too karuni daee kaa ||

Ovee 49

अगा तूं सकळ मुलांचे गणी । वयोवृद्ध असती प्राज्ञी । तरी आम्हांसी सारथी करुनी । सत्वर देई खेळावया ॥ ४९ ॥

Transliteration

Agaa too sakala mulaanche ganee | Vayovriddha asasee praajnyee | Taree aamhaansee saarathee karunee | Satvara daee khelaavayaa ||

Ovee 50

ऐसें ऐकतां मुलांचे वचन । म्हणे कर्दम आणूनि द्या देतों करुन । परी ही वासना भविष्यकारण । गोरक्षाते उदेली ॥ ५० ॥

Transliteration

Aise aikataa mulaanche vachanu | Mhane kardama aanuuni dyaa deto karunu | Paree hee vaasanaa bhavishyakaaranu | Gorakshaate udelee ||

Ovee 51

जैसे ज्याचे पूर्वानुक्रम । तैसी बुद्धि येत घडून । जेवीं बीज पेरिल्या समान । तोचि तरु हेलावे ॥ ५१ ॥

Transliteration

Jaise jyaache poorva-anukramu | Taisee buddhi yeta ghaduunu | Jevee beeja perilyaa samaanu | Tochi taru helaave ||

Ovee 52

पहा मातेच्या द्वेषउद्देशी । ध्रुव बैसला अढळपदासी । तेसेंचि वासनालेशीं । क्षीरोदधि उपमन्या ॥ ५२ ॥

Transliteration

Pahaa maatechyaa dvesha-uddeshee | Dhruva baisalaa adhala-padaasee | Tesenchi vaasanaa-leshee | Ksheera-udadhi Upamanyaa ||

Ovee 53

कीं गांधारीचा होता अंत । म्हणूनि पार्था सुचला अर्थ । अकिंचन तो वायुसुत । ध्वजस्तंभी मिरवला ॥ ५३ ॥

Transliteration

Kee Gaandhaareechaa hotaa antu | Mhanuuni Paarthaa suchalaa arthu | Akinchana toh Vaayusutu | Dhvaja-stambhee miravalaa ||

Ovee 54

कीं सीतासतीच्या उद्देशीं । लंकेसी राहिली येऊनि विवशी । तिनें भक्षुनि दशाननासी । राक्षसकुळ भक्षिलें ॥ ५४ ॥

Transliteration

Kee Seetaa-sateechyaa uddeshee | Lankesee raahilee yeuuni vivashee | Tine bhakshuni Dashaananaasee | Raakshasa-kula bhakshile ||

Ovee 55

पहा अनुसर्गकर्म कैसें । त्याचि राक्षसीं वंशलेशें । चिरंजीव होऊनि लंकाधीश । भोगभोगी बिभीषण ॥ ५५ ॥

Transliteration

Pahaa anusarga-karma kaise | Tyaachi raakshasee vamsha-leshe | Chiranjeeva houuni Lankaa-adheeshu | Bhoga-bhogee Bibheeshanu ||

Ovee 56

तस्मात् बोलावयाचें हेंचि कारण । बुद्धि संचरे पूर्वकर्माप्रमाण । पुढें उदयाते करभंजन । येणार होते महाराज ॥ ५६ ॥

Transliteration

Tasmaatu bolaavayaache henchi kaaranu | Buddhi sanchare poorva-karmaa-pramaanu | Pudhe udayaate Karabhanjanu | Yenaara hote Mahaaraaju ||

Ovee 57

नवनारायण करभंजन परम । उदय पावणार गहन नाम । म्हणूनि गोरक्षा इच्छाद्रुम । चित्तधरेतें उदेला ॥ ५७ ॥

Transliteration

Nava-Naaraayana Karabhanjana paramu | Udaya paavanaara gahana naamu | Mhanuuni Gorakshaa ichchaa-drumu | Chitta-dharete udelaa ||

Ovee 58

मग हातीं घेऊनि कर्दमगोळा । रचिता झाला उत्तम पुतळा । परी रसने पाठ संजीवन आगळा । होत असे मंत्राचा ॥ ५८ ॥

Transliteration

Maga haatee gheuuni kardama-golaa | Rachitaa jhaalaa uttama putalaa | Paree rasane paatha sanjeevana aagalaa | Hota ase mantra-achaa ||

Ovee 59

त्यांत विष्णुवीर्य उपचार । पीषयूमांडणी जल्पत स्मर । एवंविधि संजीवनीमंत्र । पाठ होता गोरक्षा ॥ ५९ ॥

Transliteration

Tyaata Vishnu-veerya upachaaru | Peephayoo-maandanee jalpata smaru | Evavidhi sanjeevanee-mantru | Paatha hotaa Gorakshaa ||

Ovee 60

मुखीं पाठ हस्तें पुतळा । पूर्णपणीं होतां कर्दमगोळा । महाभागीं भाग सकळा । व्यक्त असे तत्त्वांचा ॥ ६० ॥

Transliteration

Mukhee paatha haste putalaa | Poorna-panee hotaa kardama-golaa | Mahaa-bhaagee bhaaga sakalaa | Vyakta ase tattvaanchaa ||

Ovee 61

तेणेंकरुनि पंचभूत । दृश्यत्व पावले संजीवनीअर्थ । करभंजन ते संधींत । प्रेरक झाला जीवित्वा ॥ ६१ ॥

Transliteration

Tenen-karuni pancha-bhootu | Drishyatva paavale sanjeevanee-arthu | Karabhanjana tey sandheetu | Preraka jhaalaa jeevitvaa ||

Ovee 62

अस्थिमांस त्वचेसहित । अकार दृश्य झाला त्यांत । पुढें शब्द आननांत । अकस्मात उदेला ॥ ६२ ॥

Transliteration

Asthi-maansa tvache-sahitu | Akaara drishya jhaalaa tyaatu | Pudhe shabda aananaantu | Akasmaata udelaa ||

Ovee 63

उदय होता करी रुदन । तें पाहिलें सकळ बाळांनीं । म्हणती भूत आणिलें गोरक्षांनीं । पळा पळा येथूनियां ॥ ६३ ॥

Transliteration

Udaya hotaa karee rudanu | Tey paahile sakala baalaannee | Mhanatee bhoota aanile Gorakshaannee | Palaa palaa yethuuniyaa ||

Ovee 64

ऐसें बोलतां एकमेकांत । सकळ होऊनि भयभीत । सांडूनि खेळ सकळ अर्थ । पळूनि गेलें वातगती ॥ ६४ ॥

Transliteration

Aise bolataa ekamekaatu | Sakala houuni bhaya-bheetu | Saanduuni khela sakala arthu | Paluuni gele vaatagatee ||

Ovee 65

हृदयीं दाटूनि भयकांपरा । मुलें कांपती थरथरां । आरडत वरडत मच्छिंद्र आधारा । पळोनियां पैं गेलीं ॥ ६५ ॥

Transliteration

Hridayee daatuuni bhaya-kaamparaa | Mule kaampatee tharatharaa | Aaradata varadata Machchindra aadhaaraa | Paloniyaa pai gelee ||

Ovee 66

ऐशापरी मुलें भयग्रस्त । तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । मग पाचारुनि सकळ मुलांतें । आश्वासूनि पुसतसे ॥ ६६ ॥

Transliteration

Aishaa-paree mule bhaya-grastu | Tey paahuuni Machchindra-Naathu | Maga paachaaruni sakala mulaante | Aashvaasuuni pusatase ||

Ovee 67

म्हणे बाळां होय थरथराट । का रे कांपतां सांगा वाट । येरी मुळाहूनि सकळ बोभाट । मच्छिंद्रातें निवेदिला ॥ ६७ ॥

Transliteration

Mhane Baalaa hoya tharatharaatu | Kaa rey kaampataa saangaa vaatu | Yeree mulaa-huuni sakala bobhaatu | Machchindraate nivedilaa ||

Ovee 68

म्हणे कर्दमाचा शकटसारथी । करवीत होतों गोरक्षाहातीं । तों बालतत्त्वपणीं भूतमती । कर्दम लोपूनि संचरली ॥ ६८ ॥

Transliteration

Mhane kardamaachaa shakata-saarathee | Karaveeta hoto Goraksha-haatee | Toh baala-tattva-panee bhoota-matee | Kardama lopuuni sancharalee ||

Ovee 69

तें भूत अद्यापि आहे लहान । परी क्षणैक होईल स्थूळवटपण । आम्हांलागी करील भक्षण । म्हणूनियां पळालों ॥ ६९ ॥

Transliteration

Tey bhoota adyaapi aahe lahaanu | Paree kshanaika hoeela sthoola-vata-panu | Aamhaa-laagee kareela bhakshanu | Mhanuuniyaa padaalo(palaalo) ||

Ovee 70

परी आम्ही आलों येथें पळून । मागूनि गोरक्षनाथ येत होता धांवून । त्यासी भक्षिलें असेल भूतानें । यांत संशय नसेचि ॥ ७० ॥

Transliteration

Paree aamhee aalo yethe paluunu | Maaguuni Goraksha-Naatha yeta hotaa dhaavuunu | Tyaasee bhakshile asela bhootaane | Yaanta samshaya nasechi ||

Ovee 71

मच्छिंद्र ऐसी ऐकूनि वार्ता । साशंकित झाला चित्ता । चित्तीं म्हणे मुलें वार्ता । सांगती काय तें नोहे ॥ ७१ ॥

Transliteration

Machchindra aisee aikuuni vaartaa | Saashankita jhaalaa chittaa | Chittee mhane mule vaartaa | Saangatee kaaya tey nohe ||

Ovee 72

अवचट भूत कैसें व्यापिलें । तें पाहूनि बाळ भ्यालें । तरी आतां जाऊनि वहिलें । गोचर करावे निजदृष्टीं ॥ ७२ ॥

Transliteration

Avachata bhoota kaise vyaapile | Tey paahuuni baala bhyaale | Taree aataa jaauuni vahile | Gochara karaave nija-drishtee ||

Ovee 73

मग आश्वासूनि सकळ मुलां । निकट बैसवूनि पुसे त्यालां । कोणत्या ठायीं संचार झाला । भूताचा तो मज सांगा ॥ ७३ ॥

Transliteration

Maga aashvaasuuni sakala mulaa | Nikata baisavuuni puse tyaalaa | Konatyaa thaayee sanchaara jhaalaa | Bhootaachaa toh maja saangu ||

Ovee 74

येरी म्हणती बावा ऐक । भूत तेव्हां होतें बाळक । आतां थोर फोडोनि हांक । भक्षील आम्हां वाटतसे ॥ ७४ ॥

Transliteration

Yeree mhanatee baavaa aiku | Bhoota tevhaa hote baalaku | Aataa thora phodoni haanku | Bhaksheela aamhaa vaatatase ||

Ovee 75

मच्छिंद्र म्हणे मी असतां । तुम्हां भय नसे सर्वथा । चला जाऊं भूतासीं आतां । शिक्षा करुं आगळी ॥ ७५ ॥

Transliteration

Machchindra mhane mee asataa | Tumhaa bhaya nase sarvathaa | Chalaa jaaoo bhootaasee aataa | Shikshaa karu aagalee ||

Ovee 76

मुले म्हणती मच्छिंद्रनाथा । तुम्ही जाऊं नका तेथ । बालर्ककिरण आहे भूत । तुम्हां भक्षील तेचि घडी ॥ ७६ ॥

Transliteration

Mule mhanatee Machchindra-Naathaa | Tumhee jaaoo nakaa tethu | Baala-arka-kirana aahe bhootu | Tumhaa bhaksheela techi ghadee ||

Ovee 77

मच्छिंद्र म्हणे दुरुन । दाखवा भूताचा ठिकाण । मग तीं बाळें अवश्य म्हणोन । दुरुनी ठाव दाविती ॥ ७७ ॥

Transliteration

Machchindra mhane durunu | Daakhavaa bhootaachaa thikaanu | Maga tee baale avashya mhanonu | Durunee thaava daavitee ||

Ovee 78

यापरी इकडे गोरक्षनाथ । तोही पळाला होऊनि भयग्रस्त । मुलाचें मंडळ सांडूनि एकांतीं । लपोनियां बैसला ॥ ७८ ॥

Transliteration

Yaaparee ikade Goraksha-Naathu | Tohee palaalaa houuni bhaya-grastu | Mulaache mandala saanduuni ekaantee | Laponiyaa baisalaa ||

Ovee 79

भूत भूत ऐसें म्हणून । मुलें पळालीं आरोळ्या देऊन । तेव्हांचि गेला होता पळून । भूतभयेंकरोनियां ॥ ७९ ॥

Transliteration

Bhoota bhoota aise mhanuunu | Mule palaalee aarolyaa deuunu | Tevhaanchi gelaa hotaa paluunu | Bhoota-bhayen-karoniyaa ||

Ovee 80

ठाव लक्षूनि परम एकांत । बैसला होता शुचिष्मंत । परी हृदय धडधडीत अत्यंत । भूत येईल म्हणोनियां ॥ ८० ॥

Transliteration

Thaava lakshuuni parama ekaantu | Baisalaa hotaa shuchishmantu | Paree hridaya dhadadhadeeta atyantu | Bhoota yaeela mhanoniyaa ||

Ovee 81

येरीकडे मच्छिंद्राते । ठाव दाविती मुलें समस्त । परी दूरचि असती यत्किंचित । सन्निध न येत भयानें ॥ ८१ ॥

Transliteration

Yereekade Machchindraate | Thaava daavitee mule samastu | Paree doorachi asatee yatkinchitu | Sannidha na yeta bhayaane ||

Ovee 82

जैसा राजभयाचा तरणी । लखलखीत मिरवत असतां अवनीं । मग दुष्कृत चोर जार जारणी । दर्शनार्थ ते न येती ॥ ८२ ॥

Transliteration

Jaisaa raaja-bhaya-achaa taranee | Lakhalakheeta miravata asataa avanee | Maga dushkrita chora jaara jaaranee | Darshana-artha tey na yetee ||

Ovee 83

कीं रामनामबोधोत्तर । असतां भूत न ये समोर । कीं पीयूषीं विषदृष्टिव्यवहार । कादाकाळीं चालेना ॥ ८३ ॥

Transliteration

Kee Raama-naama-bodhottaru | Asataa bhoota na ye samoru | Kee peeyooshee visha-drishti-vyavahaaru | Kaadaakaalee chaalenaa ||

Ovee 84

तन्न्यायें मुलें भिऊन । दुरुनि दाविती मच्छिंद्रा ठिकाण । म्हणती याचि ग्रामांतून । भूत प्रगट जाहलें ॥ ८४ ॥

Transliteration

Tannyaaye mule bhiuunu | Duruni daavitee Machchindraa thikaanu | Mhanatee yaachi graamaantuunu | Bhoota pragata jaahale ||

Ovee 85

मग त्या ग्रामांत मच्छिंद्रनाथ । मुलें दावितां सधट जात । तों बाळ टाहा आरडत । महीलागीं उकिरडा ॥ ८५ ॥

Transliteration

Maga tyaa graamaanta Machchindra-Naathu | Mule daavitaa sadhata jaatu | Toh baala taahaa aaradatu | Mahee-laagee ukiradaa ||

Ovee 86

बालार्ककिरणी तेज लकाकत । मुखीं टाहा टाहा वदत । तें पाहूनि मच्छिंद्रनाथें । करभंजन ओळखिला ॥ ८६ ॥

Transliteration

Baala-arka-kiranee teja lakaakatu | Mukhee taahaa taahaa vadatu | Tey paahuuni Machchindra-Naathe | Karabhanjana olakhilaa ||

Ovee 87

हृदयीं धरुनि लवडसवडी । बाळ उचलोनि घेतला आवडीं । मग लगबगी गांवाबाहेर अतितांतडीं । बाळासह पावला ॥ ८७ ॥

Transliteration

Hridayee dharuni lavadasavadee | Baala uchaloni ghetalaa aavadee | Maga lagabagee gaavaa-baahera ati-taantadee | Baalaa-saha paavalaa ||

Ovee 88

तें सकळ मुलें पाहूनी । पळतीं झालीं प्राण घेऊनि । म्हणे नाथांनी भूत धरोनी । आणिलें आतां बरें नसे ॥ ८८ ॥

Transliteration

Tey sakala mule paahuunee | Palatee jhaalee praana gheuuni | Mhane naathaannee bhoota dharonee | Aanile aataa bare nase ||

Ovee 89

आतां त्या भूतासी देईल सोडून । मग तें आपल्या पाठीसी लागून । एकएकासी भक्षील धरुन । ऐसें म्हणून पळताती ॥ ८९ ॥

Transliteration

Aataa tyaa bhootaasee deeela soduunu | Maga tey aapalyaa paatheesee laaguunu | Ekaekaasee bhaksheela dharunu | Aise mhanuuna palataatee ||

Ovee 90

पळता पडती उठूनि जाती । भयेंकरुनि सांदींत दडती । हृदयीं धडधडा अर्थार्थ चित्तीं । लपोनियां बैसला ॥ ९० ॥

Transliteration

Palataa padatee uthuuni jaatee | Bhayen-karuni saandeenta dadatee | Hridayee dhadadhadaa artha-artha chittee | Laponiyaa baisalaa ||

Ovee 91

येरीकडे बाळ घेऊन । गोरक्षा पाहे मच्छिंद्रनंदन । सदनीं सदनीं हांका मारुन । गोरक्षातें पुकारी ॥ ९१ ॥

Transliteration

Yereekade baala gheuunu | Gorakshaa paahe Machchindra-nandanu | Sadanee sadanee haankaa maarunu | Gorakshaate pukaaree ||

Ovee 92

परीं ज्या सदनी जाय जती । तें सदनींचीं मुलें आरडूनि उठती । आई आई बया बया म्हणती । आणिक पळती पुढारां ॥ ९२ ॥

Transliteration

Paree jyaa sadanee jaaya jatee | Tey sadaneenchee mule aaraduuni uthatee | Aaee aaee bayaa bayaa mhanatee | Aanika palatee pudhaaraa ||

Ovee 93

परी सदनींसदनींचे जन । नाथा पुसती हाटकून । भय काय दाविलें मुलांकारण । म्हणूनि आरडूनि पळताती ॥ ९३ ॥

Transliteration

Paree sadaneen-sadaneenche janu | Naathaa pusatee haatakuunu | Bhaya kaaya daavile mulaan-kaaranu | Mhanuuni aaraduuni palataatee ||

Ovee 94

कोणाचें मूल घेवोनि । फिरतां तुम्ही सदनी सदनी । येरी म्हणे गोरक्ष नयनी । पाहेन तेव्हां सांगेन ॥ ९४ ॥

Transliteration

Konaache moola ghevoni | Phirataa tumhee sadanee sadanee | Yeree mhane Goraksha nayanee | Paahena tevhaa saangenu ||

Ovee 95

ऐसें बोलूनि पुढें जात । तों पातला गोरक्ष होता जेथ । उभा राहोनि अंगणांत । गोरक्षातें पाचारी ॥ ९५ ॥

Transliteration

Aise boluuni pudhe jaatu | Toh paatalaa Goraksha hotaa jethu | Ubhaa raahoni anganaantu | Gorakshaate paachaaree ||

Ovee 96

ऐकूनि श्रीगुरुची वाणी । गोरक्ष निघाला सदनांतुनी । परी येतांचि बाळ पाहिला नयनी । पुन्हां आरडूनि पळे तो ॥ ९६ ॥

Transliteration

Aikuuni Shreeguru-chee vaanee | Goraksha nighaalaa sadanaantunee | Paree yetaanchi baala paahilaa nayanee | Punhaa aaraduuni pale toh ||

Ovee 97

हा विपर्यास पाहुनि नयनीं । मच्छिंद्र विचारी आपुले मनीं । गोरक्ष व्यापला भयेकरुनी । बाळ येथें ठेवावें ॥ ९७ ॥

Transliteration

Haa viparyaasa paahuni nayanee | Machchindra vichaaree aapule manee | Goraksha vyaapalaa bhayen-karunee | Baala yethe thevaave ||

Ovee 98

मग स्वशिरींचें काढूनि वसन । त्यावरी निजविलें बाळरत्न । मग त्या सदनीं संचरुन । गोरक्षापासीं पातला ॥ ९८ ॥

Transliteration

Maga sva-shireenche kaadhuuni vasanu | Tyaavaree nijavile baala-ratnu | Maga tyaa sadanee sancharunu | Gorakshaapaasee paatalaa ||

Ovee 99

जातां कवळूनि धरिलें हृदयीं । म्हणे वाहसी व्यर्थ भयप्रवाहीं । तें भूत नाहीं मनुष्यदेहीं । करभंजन उदेला ॥ ९९ ॥

Transliteration

Jaataa kavaluuni dharile hridayee | Mhane vaahasee vyartha bhaya-pravaahee | Tey bhoota naahee manushya-dehee | Karabhanjana udelaa ||

Ovee 100

परी तयाची उदयराहाटी । सांग जाहली निर्भय पोटीं । येरी म्हणे मुलांसाठीं । खेळत होतो महाराजा ॥ १०० ॥

Transliteration

Paree tayaachee udaya-raahaatee | Saanga jaahalee nirbhaya potee | Yeree mhane mulaan-saathee | Khelata hoto Mahaaraajaa ||

Ovee 101

हाति घेऊनि कर्दमगोळा । पूर्णपणीं रचिला पुतळा । परी नेणों कैशी झाली कळा । भूत त्यांत संचरले ॥ १०१ ॥

Transliteration

Haati gheuuni kardama-golaa | Poorna-panee rachilaa putalaa | Paree neno kaishee jhaalee kalaa | Bhoota tyaata sancharale ||

Ovee 102

लोपूनि सकळ कर्दमनीती । दिसूं आली मानवाकृती । तेणें भय व्यापूनि चित्तीं । पळालों मी मुलांसह ॥ १०२ ॥

Transliteration

Lopuuni sakala kardama-neetee | Disoo aalee maanava-aakritee | Tene bhaya vyaapuuni chittee | Palaalo mee mulaansahu ||

Ovee 103

यावरी मच्छिंद्र बोले वाणी । तूतें सांगितली संजीवनी । तो मंत्र घोकितां क्षणीं । करीत होतासी काय तूं ॥ १०३ ॥

Transliteration

Yaavaree Machchindra bole vaanee | Toote saangitalee sanjeevanee | Toh mantra ghokitaa kshanee | Kareeta hotaasee kaaya too ||

Ovee 104

येरी म्हणे आज्ञा तुमची । भंगिली नाहीं शपथ पायांची । खेळतां वाणी मंत्राची । सांडिली नाही महाराजा ॥ १०४ ॥

Transliteration

Yeree mhane aajnyaa tumachee | Bhangilee naahee shapatha paayaanchee | Khelataa vaanee mantra-achee | Saandilee naahee Mahaaraajaa ||

Ovee 105

कर्दमपुतळा करितां हातीं । परी मंत्र सांडिला नाहीं उक्तीं । चुकलों नाहीं शिक्षेहाती । ओपू नका गुरुनाथा ॥ १०५ ॥

Transliteration

Kardama-putalaa karitaa haatee | Paree mantra saandilaa naahee uktee | Chukalo naahee shikshe-haatee | Opoo nakaa Guru-Naathaa ||

Ovee 106

ऐसी ऐकतां गोरक्षवाणी । मच्छिंद्र तोषला आपुले मनीं । म्हणे बा बरी केली करणी । ऊठ आतां वेगेसी ॥ १०६ ॥

Transliteration

Aisee aikataa Goraksha-vaanee | Machchindra toshalaa aapule manee | Mhane baa baree kelee karanee | Ootha aataa vegesee ||

Ovee 107

मुख कवळूनि चुंबन घेत । हास्य मानूनि कुरवाळीत । म्हणे होई आतां स्वस्थ । चाल वेगीं पाडसा ॥ १०७ ॥

Transliteration

Mukha kavaluuni chumbana ghetu | Haasya maanuuni kuravaaleetu | Mhane hoee aataa svasthu | Chaala vegee paadasaa ||

Ovee 108

येरी म्हणे गुरुनाथा । तुम्ही आणिलें आहे भूता । तें मज खाईल प्रांजळ आतां । बाहेर नेऊं नका जी ॥ १०८ ॥

Transliteration

Yeree mhane Guru-Naathaa | Tumhee aanile aahe bhootaa | Tey maja khaaeela praanjala aataa | Baahera neoo nakaa jee ||

Ovee 109

मच्छिंद्र म्हणे ऐक मात । हें बाळ नसे रे भूत । तुवा घोकोनि संजीवनीत । मनुष्यपुतळा तो झाला ॥ १०९ ॥

Transliteration

Machchindra mhane aika maatu | Hey baala nase re bhootu | Tuvaa ghokoni sanjeevaneetu | Manushya-putalaa toh jhaalaa ||

Ovee 110

जैसा गौरउकिरडां स्थान । बाळ झालासी उत्पन्न । त्याच नीतीं खेळतां कर्दम । बाळ उदयातें आलें हो ॥ ११० ॥

Transliteration

Jaisaa gaura-ukiradaa sthaanu | Baala jhaalaasee utpannu | Tyaacha neetee khelataa kardamu | Baala udayaate aale ho ||

Ovee 111

ऐसी ऐकतां गुरुगोष्टी । म्हणे भूत नोहे तपोजेठी । मच्छिंद्र म्हणे भय पोटीं । सांडी मनुष्य तें असे ॥ १११ ॥

Transliteration

Aisee aikataa Guru-goshtee | Mhane bhoota nohe tapojethee | Machchindra mhane bhaya potee | Saandee manushya tey ase ||

Ovee 112

ऐसें ऐकूनि प्रांजळ मत । मग श्रीगुरुचा धरुनि हात । बाळ होतें चीरपदरांत । तयापासी पातले ॥ ११२ ॥

Transliteration

Aise aikuuni praanjala matu | Maga Shreeguruchaa dharuni haatu | Baala hote cheera-padaraantu | Tayaapaasee paatale ||

Ovee 113

बाळ उचलोनि मच्छिंद्रनाथ । आपुल्या शिबिरा घेऊनियां जात । गोदुग्ध आणूनि पान त्वरित । ते बाळका पैं केलें ॥ ११३ ॥

Transliteration

Baala uchaloni Machchindra-Naathu | Aapulyaa shibiraa gheuuniyaa jaatu | Godugdha aanuuni paana tvaritu | Tey baalakaa pai kele ||

Ovee 114

यावरी वसनझोळीं करुन । आंत घातला गहिनीनंदन । यावरी तया गावींचे जन । शिबिरापाशीं पातले ॥ ११४ ॥

Transliteration

Yaavaree vasana-jholee karunu | Aanta ghaatalaa Gahinee-nandanu | Yaavaree tayaa gaaveenche janu | Shibiraa-paashee paatale ||

Ovee 115

नाथचरणीं अर्पूनी माथा । पुसती हे नाथ समर्था । बाळ कोणाचें हालवितां । श्रवण करु इच्छितो ॥ ११५ ॥

Transliteration

Naatha-charanee arpuunee maathaa | Pusatee hey Naatha samarthaa | Baala konaache haalavitaa | Shravana karu ichchito ||

Ovee 116

मग झाला वृत्तांत मच्छिंद्रनाथ । तयां ग्रामस्थां निवेदित । तो ऐकूनि सकळ वृत्तांत । आश्चर्य करिती क्षणोक्षणीं ॥ ११६ ॥

Transliteration

Maga jhaalaa vrittaanta Machchindra-Naathu | Tayaa graamasthaa niveditu | Toh aikuuni sakala vrittaantu | Aashcharya karitee kshanokshanee ||

Ovee 117

म्हणे धन्य धन्य संजीवनी । हा कलींत उदेला उशनामुनी । परी त्याही प्रत्यक्ष सर्वगुणीं । नाथ मच्छिंद्र वाटतो ॥ ११७ ॥

Transliteration

Mhane dhanya dhanya sanjeevanee | Haa kaleeta udelaa Ushanaa-munee | Paree tyaahee pratyaksha sarva-gunee | Naatha Machchindra vaatato ||

Ovee 118

पहा पहा हा गुरुदैत्य । शवशरीरा सावध करीत । परी त्या म्हणाया जडदेहस्थ । जीवदशा व्यापीतसे ॥ ११८ ॥

Transliteration

Pahaa pahaa haa Guru-daityu | Shava-shareeraa saavadha kareetu | Paree tyaa mhanaayaa jada-dehasthu | Jeeva-dashaa vyaapeetase ||

Ovee 119

तरी तैसा नोहे मच्छिंद्रनाथ । कर्दमपुतळा केला जिवंत । तस्मात् शुक्र तो त्या तुलनेंत । सहस्त्रभागी दिसेना ॥ ११९ ॥

Transliteration

Taree taisaa nohe Machchindra-Naathu | Kardama-putalaa kelaa jivantu | Tasmaatu Shukra toh tyaa tulanetu | Sahastra-bhaagee disenaa ||

Ovee 120

तरी उशना न म्हणूं संमती । द्वितीय ब्रह्मा पातला क्षितीं । तीही संमत गौण चित्तीं । मच्छिंद्रभाग्य दिसतसे ॥ १२० ॥

Transliteration

Taree Ushanaa na mhanoo sammatee | Dviteeya brahmaa paatalaa kshitee | Teehee sammata gauna chittee | Machchindra-bhaagya disatase ||

Ovee 121

पहा पहा विधिराज । उत्पन्न करी जगा सहज । तरी मूळ त्यांत असे बीज । बीजासमान रुख होय ॥ १२१ ॥

Transliteration

Pahaa pahaa vidhiraaju | Utpanna karee jagaa sahaju | Taree moola tyaata ase beeju | Beejaa-samaana rukha hoyu ||

Ovee 122

यावरी आणिक दुसरा अर्थ । विधी स्वअंगें उत्पत्ति करीत । तैसा नोहे मच्छिंद्रनाथ । शिष्याहाती करविला ॥ १२२ ॥

Transliteration

Yaavaree aanika dusaraa arthu | Vidhee svaange utpatti kareetu | Taisaa nohe Machchindra-Naathu | Shishyaa-haatee karavilaa ||

Ovee 123

महाबीजावीण जाण । कर्दमी केला मनुष्य उत्पन्न । तस्मात् धन्य विधीहून । मच्छिंद्रनाथ मिरविला ॥ १२३ ॥

Transliteration

Mahaa-beejaa-veena jaanu | Kardamee kelaa manushya utpannu | Tasmaatu dhanya vidheehuunu | Machchindra-Naatha miravilaa ||

Ovee 124

ऐसें परस्परें भाषण । करिती गांवींचे सकळ जन । यावरी बोलती नाथाकारण । नाथानिकट बैसूनियां ॥ १२४ ॥

Transliteration

Aise paraspare bhaashanu | Karitee gaaveenche sakala janu | Yaavaree bolatee Naathaa-kaaranu | Naathaa-nikata baisuuniyaa ||

Ovee 125

म्हणती महाराजा प्रतापतरणी । बाळाचे कष्ट करुं जाणे जननी । ती तो बाळका न दिसे करणी । गैबीनंदन हा असे ॥ १२५ ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa prataapa-taranee | Baalaache kashta karu jaane jananee | Tee toh baalakaa na dise karanee | Gaibee-nandana haa ase ||

Ovee 126

पहा बाळाचे कष्ट उत्कृष्ट । पुरुषा होईनात ते नाथा श्रेष्ठ । तरी यासी धर्मजननी वरिष्ठ । करुनि द्यावी महाराजा ॥ १२६ ॥

Transliteration

Pahaa baalaache kashta utkrishtu | Purushaa hoeenaata tey Naathaa shreshthu | Taree yaasee dharma-jananee varishthu | Karuni dyaavee Mahaaraajaa ||

Ovee 127

तीतें बाळक करीं अर्पण । करील तयाचें संगोपन । तुम्हांलागीं कष्ट दारुण । होणार नाहीत महाराजा ॥ १२७ ॥

Transliteration

Teete baalaka karee arpanu | Kareela tayaache sangopanu | Tumhaa-laagee kashta daarunu | Honaara naaheeta Mahaaraajaa ||

Ovee 128

ऐशी ऐकतां जगाची वाणी । मान तुकावी मच्छिंद्रमुनि । म्हणे बा ते धर्मजननी । कोणती करावी महाराजा ॥ १२८ ॥

Transliteration

Aishee aikataa jagaachee vaanee | Maana tukaavee Machchindra-muni | Mhane baa tey dharma-jananee | Konatee karaavee Mahaaraajaa ||

Ovee 129

ऐसें बोलतां मच्छिंद्रनाथ । विचार करिताती ग्रामस्थ । तों ग्रामामाजी विप्रगृहांत । मधुनामा नांदतसे ॥ १२९ ॥

Transliteration

Aise bolataa Machchindra-Naathu | Vichaara karitaatee graamasthu | Toh graamaa-maajee vipra-grihaantu | Madhu-naamaa naandatase ||

Ovee 130

तयाची कांता लावण्यखाणी । पतिव्रता धर्मपत्नी । सत्य संचित सर्वज्ञानी । ज्ञानकळा पै असे ॥ १३० ॥

Transliteration

Tayaachee kaantaa laavanya-khaanee | Pati-vrataa dharma-patnee | Satya sanchita sarva-jnyaanee | Jnyaana-kalaa pai ase ||

Ovee 131

नामें कौतुका असे गंगा । निर्मळपणीं असे अभंगा । पतिसेवे अंतरंगा । जगामाजी मिरवली ॥ १३१ ॥

Transliteration

Naame kautukaa ase gangaa | Nirmala-panee ase abhangaa | Patiseve antarangaa | Jagaa-maajee miravalee ||

Ovee 132

उदरीं नाहीं संतति । तेणें विव्हळ प्रेम चित्तीं । संततीवीण कामगती । संसार ते वेदना ॥ १३२ ॥

Transliteration

Udaree naahee santati | Tene vivhala prema chittee | Santatee-veena kaama-gatee | Sansaara tey vedanaa ||

Ovee 133

सदा वाटे हुरहुर । लोकांचे पाहूनि किशोर । चिंत्ती पाहूनि चित्ती गहिर । साशंकित होताती ॥ १३३ ॥

Transliteration

Sadaa vaate hurahuru | Lokaanche paahuuni kishoru | Chinttee paahuuni chittee gahiru | Saashankita hotaatee ||

Ovee 134

नाना यत्न संततीसाठीं । करुनि बैसले होते जेठी । उपाय न चाले परम कष्टी । जगामाजी मिरविला ॥ १३४ ॥

Transliteration

Naanaa yatna santatee-saathee | Karuni baisale hote jethee | Upaaya na chaale parama kashtee | Jagaa-maajee miravilaa ||

Ovee 135

ऐसे असतां उभय जन । तो दैवें उदेला मांदुसाकारण । ग्रामस्थांकरीं तयाचें स्मरण । अकस्मात पैं झाले ॥ १३५ ॥

Transliteration

Aise asataa ubhaya janu | Toh daive udelaa maandusaa-kaaranu | Graama-sthaan-karee tayaache smaranu | Akasmaata pai jhaale ||

Ovee 136

जैसा द्रोणाचा विषमकाळ । निवटावया उदेला उत्तम वेळ । सहजखेळीं गांधारी बाळ । विटी कूपांत पडियेली ॥ १३६ ॥

Transliteration

Jaisaa dronaachaa vishama-kaalu | Nivataavayaa udelaa uttama velu | Sahaja-khelee gaandhaaree baalu | Vitee koopaanta padiyelee ||

Ovee 137

कीं रत्नांची होणे उत्पत्ती । म्हणोनि देवदानवमती । अब्धिमंथनी उदेली चित्तीं । एकभावेंकरुनियां ॥ १३७ ॥

Transliteration

Kee ratnaanchee hone utpattee | Mhanoni deva-daanava-matee | Abdhi-manthanee udelee chittee | Eka-bhaaven-karuniyaa ||

Ovee 138

तन्न्यायें मधुविप्राचें । दैव उदेलें जगमुखें साचें । म्हणूनि स्मरण निघालें त्यांचे । मान्य पडलें सर्वांसी ॥ १३८ ॥

Transliteration

Tannyaaye Madhu-vipraache | Daiva udele jagamukhe saache | Mhanuuni smarana nighaale tyaanche | Maanya padale sarvaansee ||

Ovee 139

मग मच्छिंद्रनाथा विनवणी करुन । म्हणती महाराजा मधुब्राह्मण । तयाची कांता परम सगुण । ज्ञानकळा असे कीं ॥ १३९ ॥

Transliteration

Maga Machchindra-Naathaa vinavanee karunu | Mhanatee Mahaaraajaa Madhu-braahmanu | Tayaachee kaantaa parama sagunu | Jnyaana-kalaa ase kee ||

Ovee 140

तो वोपूनि बाळ गोमट । तेथेचि होईल पूर्ण शेवट । पुत्रार्थिया परम अनिष्ट । दिवस असती महाराजा ॥ १४० ॥

Transliteration

Toh vopuuni baala gomatu | Tethechi hoeela poorna shevatu | Putra-arthiyaa parama anishtu | Divasa asatee Mahaaraajaa ||

Ovee 141

ऐसी ऐकूनि मच्छिंद्रवाणी । पुत्राच्या राहे संरक्षणी । मग त्या विप्रा बोलावूनि । कांतेसहित आणिलें ॥ १४१ ॥

Transliteration

Aisee aikuuni Machchindra-vaanee | Putraachyaa raahe sanrakshanee | Maga tyaa vipraa bolaavuuni | Kaante-sahita aanile ||

Ovee 142

परी ते भार्या लावण्यराशी । सद्गुणवर्या जगासी । नाथ पाहतांच ते चित्तासी । ओळखिलें हृदयांत ॥ १४२ ॥

Transliteration

Paree tey bhaaryaa laavanya-raashee | Sadguna-varyaa jagaasee | Naatha paahataancha tey chittaasee | Olakhile hridayaatu ||

Ovee 143

मनांत म्हणे मच्छिंद्रनाथ । उत्तम जागीं दिसून येत । सकळ जग मान देत । तस्मात् श्रेष्ठ आतां हे ॥ १४३ ॥

Transliteration

Manaanta mhane Machchindra-Naathu | Uttama jaagee disuuna yetu | Sakala jaga maana detu | Tasmaatu shreshtha aataa hey ||

Ovee 144

जो जगामाजी आहे भला । तो तैसाचि परलोकां ठेला । जो जगीं जाय मानवला । परलोकीं मानवला तोचि एक ॥ १४४ ॥

Transliteration

Jo jagaa-maajee aahe bhalaa | Toh taisaachi paralokaa thelaa | Jo jagee jaaya maanavalaa | Paralokee maanavalaa tochi eku ||

Ovee 145

आणिक भविष्य अवश्य जाण । अर्थाअर्थी करी गमन । मग कौतुकानें जवळ घेऊन । बाळ ओटी ओपीतसे ॥ १४५ ॥

Transliteration

Aanika bhavishya avashya jaanu | Arthaa-arthee karee gamanu | Maga kautukaane javala gheuunu | Baala otee opeetase ||

Ovee 146

म्हणे माय वो माय ऐक । हा बाळ आहे वरदायक । नवनारायणांतील एक । करभंजन मिरवला ॥ १४६ ॥

Transliteration

Mhane maaya vo maaya aiku | Haa baala aahe varada-aayaku | Nava-Naaraayanaanteela eku | Karabhanjana miravalaa ||

Ovee 147

याचें होता संगोपन । फेडील दृष्टीचें पारण । जगामाजी स्थूलवट मान । पुत्र तुझा मिरवेल हा ॥ १४७ ॥

Transliteration

Yaache hotaa sangopanu | Phedeela drishteeche paaranu | Jagaa-maajee sthoola-vata maanu | Putra tujhaa miravela haa ||

Ovee 148

म्हणसील हा होईल कैसा । तरी कीर्तिध्वज मित्र जैसा । कीं देवकीचा हरि जैसा । वंद्य असे जगातें ॥ १४८ ॥

Transliteration

Mhanaseela haa hoeela kaisaa | Taree keerti-dhvaja Mitra jaisaa | Kee Devakeechaa Hari jaisaa | Vandya ase jagaate ||

Ovee 149

माय मी काय सांगू गहन । या बाळाचे चांगुलपण । मूर्तिमंत याचे सेवेकारण । कैलासपती उतरेल गे ॥ १४९ ॥

Transliteration

Maaya mee kaaya saangoo gahanu | Yaa baalaache chaangula-panu | Moortimanta yaache seve-kaaranu | Kailaasa-patee utarela ge ||

Ovee 150

तयाची निवटूनी अज्ञानराशी । हा अनुग्रह होईल तयासी । आणूनि ठेवील निवृत्तिपदासीं । निवृत्तिनामें मिरवुनी ॥ १५० ॥

Transliteration

Tayaachee nivatuunee ajnyaana-raashee | Haa anugraha hoeela tayaasee | Aanuuni theveela Nivritti-padaasee | Nivritti-naame miravunee ||

Ovee 151

म्हणे हा अयोनि संभवला । जगामाजी सहज गे मिरवला । परी अति गहनीं नाम याला । गहनी ऐसें देई कां ॥ १५१ ॥

Transliteration

Mhane haa ayoni sambhavalaa | Jagaa-maajee sahaja ge miravalaa | Paree ati sahanee (gahanee) naama yaalaa | Gahanee aise deee kaa ||

Ovee 152

यावरी आणिक सांगतो तुजसी । आम्ही जातों तीर्थस्नानासी । उपरी फिरुनि द्वादशवर्षी । गोरक्षबाळ येईल गे ॥ १५२ ॥

Transliteration

Yaavaree aanika saangato tujasee | Aamhee jaato teertha-snaanaasee | Uparee phiruni dvaadasha-varshee | Goraksha-baala yaeela ge ||

Ovee 153

तो यातें अनुग्रह देऊन । माय गे करील सनातन । परी तूं आता जीवित्व लावून । संगोपन करी याचें ॥ १५३ ॥

Transliteration

Toh yaate anugraha deuunu | Maaya ge kareela sanaatanu | Paree too aataa jeevitva laavuunu | Sangopana karee yaache ||

Ovee 154

यावरी बोले कौतुकें सती । कीं महाराजा योगमूर्ती । बाळ ओपिलें माझे हातीं । परी संशय एक असे ॥ १५४ ॥

Transliteration

Yaavaree bole kautuke satee | Kee Mahaaraajaa yoga-moortee | Baala opile maajhe haatee | Paree sanshaya eka ase ||

Ovee 155

तुम्ही द्वादश वरुषां आला परतोन । बाळ न्याल कीं मजपासून । मग कैसें जननीपण । जगामाजी मिरवावे ॥ १५५ ॥

Transliteration

Tumhee dvaadasha varushaa aalaa paratonu | Baala nyaala kee maja-paasuunu | Maga kaise jananee-panu | Jagaa-maajee miravaave ||

Ovee 156

मग केल्या कष्टाचें आचरण । मज मिरवेल कीं भाडायितपण । तरी प्रांजलपणीं आतांचि वचन । मजप्रती सांगिजे ॥ १५६ ॥

Transliteration

Maga kelyaa kashtaache aacharanu | Maja miravela kee bhaadaayita-panu | Taree praanjala-panee aataanchi vachanu | Majapratee saangije ||

Ovee 157

पहा पहा जी आशाबद्ध । सकळ जग असे प्रसिद्ध । तरी इच्छा प्रांजळ शुद्धबुद्ध । एकभागीं लावा जी ॥ १५७ ॥

Transliteration

Pahaa pahaa jee aashaa-baddhu | Sakala jaga ase prasiddhu | Taree ichchaa praanjala shuddha-buddhu | Eka-bhaagee laavaa jee ||

Ovee 158

तुम्हां आशा असेल याची । तरी तैशीच गोष्टी सांगायाची । मग नाथ गोष्टी ऐकूनि तिची । प्रांजळ वचन बोलतसे ॥ १५८ ॥

Transliteration

Tumhaa aashaa asela yaachee | Taree taisheecha goshtee saangaayaachee | Maga Naatha goshtee aikuuni tichee | Praanjala vachana bolatase ||

Ovee 159

माये संशय सांडूनि मनीं । बाळ न्यावें आपुलें सदनी । माझी आशा बाळालागुनी । गुंतत नाहीं जननीये ॥ १५९ ॥

Transliteration

Maaye sanshaya saanduuni manee | Baala nyaave aapule sadanee | Maajhee aashaa Baalaa-laagunee | Guntata naahee jananeeye ||

Ovee 160

तरी तुज तुझा लाभो सुत । प्रांजळपणीं मिरवी जगांत । तूं माय हा सुत । लोकांमाजी बोलतील ॥ १६० ॥

Transliteration

Taree tuja tujhaa laabho sutu | Praanjala-panee miravee jagaatu | Too maaya haa sutu | Lokaam-maajee bolateelu ||

Ovee 161

मी आणि माझा शिष्य । गुंतणार नाहीं या आशेस । हा बाळ तुमचा तुम्हांस । लखलखीत बोलतों ॥ १६१ ॥

Transliteration

Mee aani maajhaa shishyu | Guntanaara naahee yaa aashesu | Haa baala tumachaa tumhaansu | Lakhalakheeta bolato ||

Ovee 162

परी गोरक्ष अनुग्रह देईल यासी । पुढें जाईल तीर्थस्नानांसी । तूं सांभाळ तुजपाशी । चिरंजीव असो हा ॥ १६२ ॥

Transliteration

Paree Goraksha anugraha daeela yaasee | Pudhe jaaeela teertha-snaanaansee | Too saambhaala tuja-paashee | Chiranjeeva aso haa ||

Ovee 163

ऐसें बोलूनि ग्रामस्थांतें । शपथपूर्वक साक्षसहित । निर्मळपणीं करुनि चित्त । कौतुकसदनीं बोलवी ॥ १६३ ॥

Transliteration

Aise boluuni graamasthaante | Shapatha-poorvaka saaksha-sahitu | Nirmala-panee karuni chittu | Kautuka-sadanee bolavee ||

Ovee 164

मंत्रे चर्चूनि विभूति माळा । मोहनास्त्र घातलें गळां । कौतुकें स्पर्शीत हृदयकमळा । पयोधरीं पय दाटतसे ॥ १६४ ॥

Transliteration

Mantre charchuuni vibhooti maalaa | Mohana-astra ghaatale galaa | Kautuke sparsheeta hridaya-kamalaa | Payodharee paya daatatase ||

Ovee 165

मग तें बाळ लावोनि स्तनीं । गांवींच्या आणूनि सुवासिनी । पालखांत घातलें प्रेमेंकरुनी । गहनी नाम स्थापिले ॥ १६५ ॥

Transliteration

Maga tey baala laavoni stanee | Gaaveenchyaa aanuuni suvaasinee | Paalakhaanta ghaatale premen-karunee | Gahanee naama sthaapile ||

Ovee 166

यावरी मच्छिंद्र कांही दिवस । तया ग्रामीं करुनि वास । मग सवें घेऊनि गोरक्षास । तीर्थस्नाना चालिला ॥ १६६ ॥

Transliteration

Yaavaree Machchindra kaanhee divasu | Tayaa graamee karuni vaasu | Maga save gheuuni Gorakshaasu | Teertha-snaanaa chaalilaa ||

Ovee 167

पुसूनि सकळ ग्रामस्थांसी । निघता झाला गौरवेसीं । मार्ग लक्षूनि तीर्थस्नानासी । बद्रिकाश्रमीं जातसे ॥ १६७ ॥

Transliteration

Pusuuni sakala graamasthaansee | Nighataa jhaalaa gauravesee | Maarga lakshuuni teertha-snaanaasee | Badrikaa-aashramee jaatase ||

Ovee 168

परी मार्गी चालतां वाटीवाट । श्रीगोरक्षाच घेऊनि पाठ । कार्यरुपी कार्य घेऊनि अलोट । परीक्षेतें पाहतसें ॥ १६८ ॥

Transliteration

Paree maargee chaalataa vaatee-vaatu | Shree-Gorakshaacha gheuuni paathu | Kaarya-rupee kaarya gheuuni alotu | Pareekshete paahatase ||

Ovee 169

नंतरी ते पाहतां परी विषम अशी । विषम दिसती सर्व कार्यासी । मग मच्छिंद्र विचार करी मानसी । तप पूर्ण नसे या ॥ १६९ ॥

Transliteration

Nantaree tey paahataa paree vishama ashee | Vishama disatee sarva kaaryaasee | Maga Machchindra vichaara karee maanasee | Tapa poorna nase yaa ||

Ovee 170

मुळींच पदरी पैसा नसतां । कीम दान मिरवी दांभिका व्ययसा । तेवीं मंत्रहेतु तपोलेशा । विना विषम आहे हा ॥ १७० ॥

Transliteration

Muleencha padaree paisaa nasataa | Keema daana miravee daambhikaa vyayasaa | Tevee mantrahetu tapoleshaa | Vinaa vishama aahe haa ||

Ovee 171

तरी आतां बदरिकाश्रमीं । बद्रीकेदार उभा स्वामी । तया हाती गोरक्ष ओपूनी । तयालागीं रुझवावा ॥ १७१ ॥

Transliteration

Taree aataa Badarikaa-aashramee | Badree-Kedaara ubhaa svaamee | Tayaa haatee Goraksha opuunee | Tayaa-laagee rujhavaavaa ||

Ovee 172

ऐसा विचार करुनि चित्तीं । उभयतां हिंडले नाना तीर्थी । मग लक्षूनि हिमाचलमार्गाप्रती । बद्रिकाश्रमाप्रती पैं गेले ॥ १७२ ॥

Transliteration

Aisaa vichaara karuni chittee | Ubhayataa hindale naanaa teerthee | Maga lakshuuni Himaachala-maargaapratee | Badrikaa-aashramaapratee pai gele ||

Ovee 173

गेले परी तेथिल कथन । पुढिलें अध्यायीं होईल श्रवण । अर्थ धरुनि अपूर्ण । स्वीकार करावा श्रोत्यांनीं ॥ १७३ ॥

Transliteration

Gele paree tethila kathanu | Pudhile adhyaayee hoeela shravanu | Artha dharuni apoornu | Sveekaara karaavaa shrotyaannee ||

Ovee 174

तुम्ही विचक्षण श्रोते संत । सदा तुमचा धुंडीसुत । सेवेलागीं अर्थी प्राणांत । ग्रंथ आदरी मिरवितसे ॥ १७४ ॥

Transliteration

Tumhee vichakshana shrote santu | Sadaa tumachaa Dhundee-sutu | Seve-laagee arthee praanaantu | Grantha aadaree miravitase ||

Ovee 175

तुमचे कृपेचें लेवूनि भूषण । नरहरिवंश पूर्ण । कवि मालू धुंडीनंदन । संतगणीं मिरवला ॥ १७५ ॥

Transliteration

Tumache kripeche levuuni bhooshanu | Narahari-vansha poornu | Kavi Maaloo Dhundee-nandanu | Santaganee miravalaa ||

Ovee 176

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । दशमाध्याय गोड हा ॥ १७६ ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya Kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Dashama Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार दशमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Dashama Adhyaya Samapth